# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १९ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

राज्य घटना निर्मात्यांना अभिमान वाटेल असा भारत घडवण्यासाठी देशवासीयांनी कार्यरत रहावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरील आपल्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या ११८व्या भागातून त्यांनी आज सकाळी संवाद साधला, त्यावेळी मोदी बोलत होते. पुढील रविवारी २६ जानेवारीला असलेल्या 'प्रजासत्ताक दिनानिमित्त' सर्व देशवासियांना मोदी यांनी शुभेच्छा दिल्या. राज्यघटनेच्या अंमलबजावणीस ७५ वर्षे पूर्ण होत असून आपल्याला राज्य घटना देणाऱ्यांचे विचार-शब्द हा आपला सर्वात मोठा वारसा असल्याचं ते म्हणाले. राज्यघटना सभेतील काही नेत्यांच्या मूळ आवाजातील ध्वनीफीत पंतप्रधानांनी ऐकवली. राज्यघटना सभा एकसंध- एकमताची- सामान्य हितासाठी एकत्र काम करणारी असण्याबाबत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते, असं मोदी म्हणाले. २५ जानेवारी रोजी असलेल्या राष्ट्रीय मतदार दिनाबाबत बोलतांना पंतप्रधानांनी राज्यघटनेमध्ये निवडणूक आयोग आणि लोकशाहीत लोकांच्या सहभागाला खूप महत्त्वाचं स्थान असल्याचं सांगितलं. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील ऐतिहासिक कामगिरीद्वारे आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं होणारी वाटचाल अभिमानास्पद असल्याचं सांगतांना, शास्त्रज्ञांनी उपग्रहांची अंतराळात जोडणीद्वारे, अंतराळ स्थानकांसह तिथल्या मोहिमांसाठीचं अवगत केलेलं तंत्रज्ञान महत्त्वाचं आहे असं त्यांनी नमूद केलं. एकंदर ही कामगिरी म्हणजे आव्हानांवर उपायासाठी भारतातील शास्त्रज्ञ-नवोन्मेषक किती दूरदर्शी असल्याचा पुरावा असल्याचं मोदींनी नमूद केलं.

समर्पणासह उत्साहामुळे नावीन्य, सर्जनशीलता आणि यशाचा मार्ग सापडतो असं सांगून महाराष्ट्रातील वाशिमसह देशाच्या विविध ठिकाणची छोटी शहरं नवोद्योग - स्टार्टअपची केंद्र बनत असल्याचं ते म्हणाले. याद्वारे तरुण मित्र पारंपरिकतेहून अधिक पुढचा विचार करत यश मिळवत असल्याचं मोदी म्हणाले.

प्रयागराजमधील महाकुंभमेळा हा हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेत अविस्मरणीय गर्दी, मनोहारी दृश्य आणि समानता - सौहार्दाचा एक अनन्यसाधारण संगम असून त्याची लोकप्रियता भारतीयांसाठी अभिमानास्पद असल्याचं ते म्हणाले. परंपरा भारताला एका सूत्रात बांधतात हे कुंभमेळ्याचा उत्सव सांगतो. उत्तरेपासून दक्षिणेकडे श्रद्धांचे पालन करण्याचे मार्ग सारखेच असून प्रयागराजसह, उज्जैन, नाशिक,हरिद्वार इथं कुंभमेळा होतो, त्याप्रमाणे दक्षिणेत गोदावरी, कृष्णा, नर्मदा, कावेरी नद्यांच्या काठावर पुष्करम होतो, असं त्यांनी नमुद केलं. कुंभमेळ्यातील तरुणांच्या सहभागाबाबत बोलतांना, तरुण पिढी आपल्या संस्कृतीशी अभिमानानं जोडली गेल्यास तिची मुळं आणखी मजबूत होत असल्यानं तिची भविष्यातील उज्ज्वलताही सुनिश्चित होते असं पंतप्रधान म्हणाले. आपले सण-परंपरा अध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पैलूला बळकटी देत असल्याचं सांगून विकासाच्या मार्गावर चालतांना आपला वारसा जपत त्यातून प्रेरणाही घायची असल्याचं मोदींनी सांगितलं. २३ जानेवारीला असलेल्या थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती –'पराक्रम दिवस'चा उल्लेख करतांना मोदी यांनी बोस यांचं नभोवाणीशी असलेलं नातं आणि आझाद हिंद रेडीओबाबत आपले विचार मांडले.

****

स्वित्झर्लंड मधील दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या गुंतवणूक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी मध्यरात्री रवाना झाले. आजपासून येत्या २४ तारखेपर्यंत ही परिषद होत आहे. मुख्यमंत्री या दौऱ्यात अनेक जागतिक नेत्यांच्याही भेटी घेणार आहेत. डेटा सेंटर, वाहनउद्योग, सेमीकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, लोखंड, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत.

****

बीड तालुक्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ आज सकाळी एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू झाला. बीडहून परभणीकडे जाणाऱ्या या बसनं पोलिस भरतीसाठी धावण्याचा सराव करणाऱ्यांना धडक दिली. त्यात दोघांचा

अपघातस्थळीच मृत्यू झाला. तर अन्य एका गंभीर जखमीचा बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. मृत घोडका राजुरीचे रहिवासी आहेत. अपघातानंतर संतप्त जमावाने बस पेटवून दिली. पोलिसांनी बसचालकाला अटक केली आहे.

****

लातूर जिल्ह्यात उदगीर इथं अनेक कावळे 'एव्हीयन इन्फल्युएन्झा एच 5 एन 1' विषाणुजन्य रोगामुळं मृत झाल्याचं तपासणीत आढळलं आहे. यामुळं उदगीर शहरातल्या महात्मा गांधी उद्यान, हुतात्मा स्मारक, नगरपरिषद वाचनालय, पाण्याची टाकी परिसर हा अलर्ट झोन - सावधानता क्षेत्र म्हणून जाहिर झाला आहे. शहरातल्या बाधित परिसराचं निर्जंतुकीकरण केलं जाणार आहे. तसंच प्रभावित क्षेत्राच्या दहा किलोमीटर परिसरातल्या कुक्कुट पक्ष्यांच्या सर्वेक्षेणातून नमुणे तपासणीसाठी पाठवण्याचे आदेश लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिले आहेत.

****

बीड जिल्ह्यातील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी रोज नवीन माहिती समोर येत असून यातील आर्थिक बाबींचा तपास होत नाही असं सांगतांना विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज छत्रपती संभाजीनगर इथल्या क्रांती चौकातून मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत तालुक्यात कुरुंदा इथं परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेतील तिजोरीची शनिवारी मध्यरात्री चोरी झाली. या तिजोरीत सुमारे सात लाख रुपये रक्कम असल्याचं बँकेतर्फे सांगण्यात आलं.

****